# शेतकऱ्यांच्या वाटा झाल्या बिकट ; पांदन रस्त्यामुळे पेरणी झाली किचकट !

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव** - यावर्षी अतिवृष्टीमुळे शेत शिवारात अनेक पांदन रस्ते खराब झाले असून त्या पांदण रस्त्याची अवस्था बिकट झाली असल्याने शेतकऱ्यांना पेरणीसाठी खूपच त्रास होत आहे.



कोणतीही शेतीपयोगी वाहने शेतात जात नाहीत, त्यामुळे पेरणी वेळेत करता येत नाही. यावर्षी सोयाबीन पेरणीसाठी ही खूपच हाल झाले असून कसेबशी पेरणी झाली. परंतु आता रब्बी हंगामाला सुरुवात झाली. असुनही पेरणीसाठी वाटा बिकट असल्याने पांदन रस्ते कधी होणार? असे वारंवार प्रश्न निर्माण होत आहेत. तरीसुद्धा शेतकरी आशावादी आहे. याबाबत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते राम इढोळे यांनी प्रशासनाला पांदण रस्ते होण्यासंदर्भात अनेक निवेदन दिली. परंतु शासनाने अद्याप पर्यंत कोणताही निर्णय घेतला नसल्याने पांदन रस्ते जसेच्या तशेच कायम आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जन्म - मरणाचे प्रश्न निर्माण होत आहेत. अगोदरच आस्मानी अतिवृष्टीमुळे व सरकारच्या सुलतानी संकटामुळे शेतकरी अडचणीत आलेला आहे.

शासन बोलते एक करते एक, शासनाकडून पाहिजे त्या प्रमाणात मदत होतांना दिसतच नाही. शेतकऱ्यांना पांदन रस्ते चांगले करणे संदर्भात कोणतीही ठोस भूमिका घेऊन निर्णय होत नाहीत. शेतकऱ्यांचे कायम कष्टातच आयुष्य घालवावे लागते, परंतु शासनाचा शेतकऱ्या प्रती असलेला सेवाभाव दिसत नाही. शासनाने परिसरातील पांदन रस्त्याकडे लक्ष देऊन प्रशासनाने याबाबतची दखल घ्यावी अशी मागणी राम इढोळे यांनी केली आहे.

# शासनाच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात!

## सोयाबीन पिकाचे नुकसान, भाव नाही, कर्जाचा बोजा कायम

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - तालुक्यातील अनेक गावांमध्ये यंदा झालेल्या अवकाळी पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या शेतात उभे असलेले सोयाबीन पिक काढायलाही पुरेसे न राहिल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.



शासनाने या संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी ठोस मदत जाहीर न केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी पावसामुळे झाकून ठेवलेल्या सुड्यांमध्ये पाणी शिरले, परिणामी सडलेले व अंकुरलेले सोयाबीन शेतकऱ्यांच्या हाती आले. तीन एकरात पाच पोते एवढेच उत्पादन झाल्याने, आणि बाजारात भाव केवळ ३५०० ते ४००० रुपये क्विंटल असल्याने, उत्पादन खर्चही वसूल होत नाही. सोयाबीन पिकासाठी शेतकऱ्यांनी एकरी सुमारे १२ ते १५ हजार रुपये खर्च केले होते, मात्र परतावा केवळ काही हजार रुपयांचा मिळत असल्याने त्यांचे दिवाळे निघाले आहे. सोयाबीन पिक काढणे, वाहतूक, थ्रेशरचा खर्च यासाठी शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घ्यावे लागत आहे. काहींना तर पत्नीचे दागिने मोडावे लागले, तर काहींना सावकाराकडून पैसे घ्यावे लागले. त्यातच पुढील हंगामाचे पीक पेरायचे कसे हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. शासनाने कर्जमाफी व मदत जाहीर केली नसल्याने शेतकरी असंतोष व्यक्त करत आहेत. 'मुख्यमंत्री आणि शासन केवळ घोषणा करतात, प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या हातात काहीच पडत नाही,' अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. काही शेतकऱ्यांनी असा सवाल उपस्थित केला की 'खराब झालेल्या सोयाबीनला न्याय कोण देणार?' दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळातही शेतकरी शेतात राबत आहेत, तर शासनातील अधिकारी आणि मंत्री फटाके फोडत उत्सव साजरा करत आहेत, ही विडंबनात्मक स्थिती आहे. शेतकऱ्यांच्या घरात मात्र अंधार आहे. शेतकरी वर्गात अशीही नाराजी आहे की शासनाने शेतमालावर लावलेला जीएसटी, खताच्या भावातील वाढ, आणि खते- औषधांच्या उपलब्धतेतील अडचणी यांनी त्यांच्या संकटात अधिक भर टाकली आहे. कृषी विभाग व प्रशासन यांच्याकडून ठोस उपाययोजना न झाल्यास, येत्या काळात शेतकरी आक्रोश वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, 'जर शासनाने तातडीने नुकसानग्रस्त सोयाबीन पिकाचे पंचनामे करून मदत जाहीर केली नाही, तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल.'

# विठ्ठलवाडी येथे बुधवारी 'दीपोत्सव' बहारदार गीत- संगीताचा सांस्कृतिक कार्यक्रम

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशीम** - सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने रसिकांची दिवाळी स्वर संगीताने उजळण्यासाठी शास्त्रीय संगीत, मराठी गीत संगीत व अभंगवाणी 'दीपोत्सव' बहारदार गीत- संगीताच्या सांस्कृतिक व विनामुल्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विठ्ठलवाडी सभागृहात बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:४० वाजता ठेवण्यात आला आहे.

कार्यक्रमासाठी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांची संकल्पना व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी (भाप्रसे) यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक मयुर सुकाळे, मुंबई कुणाल वराळे, छ. संभाजीनगर, प्रसिद्ध गायिका प्रतीक्षा कांबळे व स्थानिक कलाकार शाहीर संतोष खडसे यांच्या गितसंगीत व गायनाच्या कार्यक्रमाची मेजवाणी रसिकांना ऐकायला मिळणार आहे.

दिवाळी निमित्ताने राज्यात विविध ठिकाणी मराठी बहारदार गीतांचा कार्यक्रम रसिकांसाठी सादर होणार आहेत. वाशिम येथील हा कार्यक्रम रसिक प्रेक्षकांना विनामूल्य पाहता येणार आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त रसिक प्रेक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

# विविध मागण्यांसाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन जबाबदारी पूर्ण मग मोबदला अर्धाच का?

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**कारंजा** - तालुयातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी २० ऑटोबर पुन्हा एकदा ठाम पवित्रा घेतला. त्या अनुषंगाने २० ऑटोबर रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेनेच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात तालुकाभरातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सहभाग दिसून आला.



यावेळी आंदोलकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्याचे निवेदन गटविकास अधिकारी, पंचायत समिती कारंजा यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केले. वाशीम जिल्ह्यातील सहा तालुयापैकी केवळ कारंजा तालुयालाच सतत निधी कमी मिळतो, याचे कोणतेही स्पष्ट कारण प्रशासनाकडून दिले जात नाही. कारंज्याला नेहमीच कमी निधी का दिला जातो? यामागे कोणती अडचण आहे की हेतुपुरस्सर दुर्लक्ष? असा थेट सवाल कामगार संघटनेने या आंदोलनातून प्रशासनास केला. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सध्या केवळ ५० टक्के वेतन मिळत असल्याने नाराजी उसळली. त्यामुळे काम पूर्ण, जबाबदाऱ्या पूर्ण मग मोबदला अर्धाच का? उर्वरित ५० टक्के देणार कोण? असा प्रश्न आंदोलकांनी प्रशासना समोर ठेवला. कर्मचाऱ्यांनी ग्राम पंचायतींच्या घरपट्टी आणि पाणीपट्टी वसुली अहवालांवरही संशय व्यक्त केला. वसुली केवळ ५० टक्के असल्याचा दाखला दिला जातो, परंतु ते आकडे खरे आहेत की खोटे याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी देखील कर्मचाऱ्यांनी केली आहे.

तब्बल १० महिन्यांचे थकीत एरियर्स, जीपीएफ कपात न होणे, आणि राहणीमान भत्ता न मिळणे यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. त्यामुळे कारंजा तालुयाला न्याय्य निधी वाटप, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना १०० टक्के वेतन तात्काळ देणे, घरपट्टी आणि पाणीपट्टी वसुली अहवालांची चौकशी आणि थकीत एरियर्स, जीपीएफ कपात व राहणीमान भत्ता देयक त्वरित मंजूर करणे अशा मागण्या करण्यात आल्या आहे. आम्ही गावोगाव विकासाची कामं करत आहोत, पण आमचं स्वतःचं जगणं अनिश्चिततेत आहे. आमच्या मागण्या न्याय्य आहेत आणि त्यांची पूर्तता होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील. असा निर्धार यावेळी सहभागी आंदोलकांनी व्यक्त केला. या आंदोलनात कारंजा तालुयातील ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# सामाजिक वनीकरणाची 'झाडे लावा, झाडे जगवा' योजना कागदावरच का ?



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी दरवर्षी सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात येते. वृक्षारोपण करताना त्यावर कोट्यवधीचा खर्च केला जातो. मात्र, लावलेली झाडे जगली की नाहीत याचे मूल्यमापन सामाजिक वनीकरणांकडून होत नसल्याने कोट्यवधी रुपये खर्च करून लावलेल्या रोपट्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसून येत आहे.

शासना मार्फत गाव पातळीवर सामाजिक वनीकरण विभागाकडून वृक्षारोपणासाठी अनेक योजना राबवल्या जातात. मात्र, या योजना गावपातळी पर्यंत पोहोचताना दिसत नसून 'झाडे लावा झाडे जगवा' वृक्ष लागवड योजना आता केवळ कागदावरच दिसून येत असल्याने सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांचे या बाबीकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. वृक्ष तोडीच्या प्रकारांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून लाकूड तस्करांकडून होणाऱ्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होताना दिसत आहे. शासन दरवर्षी शाळा, महाविद्यालय, निमशासकीय संस्था यांसह विविध शासकीय कार्यालयांना दरवर्षी वृक्षारोपणाचे निर्देश दिले जातात. यानुसार पावसाळ्यात जून, जुलै महिन्यामध्ये वृक्ष लागवड केली जाते. मात्र, ही झाडे लावा झाडे जगवा ही योजना केवळ औपचारिकताच दिसून येत आहे. दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून वृक्षांची लागवड केली जाते. गावागावांमध्ये वन विभागाच्या हद्दीमध्ये रोपटी लावली जातात. मात्र, त्याच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे लावलेली रोपटी जगली की वाळली, याची पाहणी सुद्धा सामाजिक वनीकरण विभागाकडून होताना दिसत नाही. दरवर्षी एकाच खड्यात झाडे लावण्याचा प्रकार समोर दिसत आहे. अनेक संस्था, शाळकरी विद्यार्थी युवा वर्ग आदींच्या पुढाकारातून वृक्षारोपणाचे कार्यक्रम केले जातात. कित्येक मान्यवर मंडळी आणि अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येते. मात्र, या लावलेल्या रोपट्यांचे पुढे काय झाले याकडे लक्ष द्यायला कोणीही धजावत नसल्याचे चित्र समोर येत आहे. यातूनच शासनाची वृक्ष लागवड योजना कागदावरच दिसत आहे. ही योजना नेमकी कोणाच्या फायद्याची? हा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाकडून राबवल्या जाणाऱ्या वृक्षारोपणाची योजना ही फक्त नावापुरतीच राबवली जात आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून दरवर्षी त्याच त्याच खड्यांमध्ये वृक्ष लागवडीचे काम केले जाते. त्यामुळे सुज्ञ नागरिकांना बरोबर घेऊन वृक्षारोपणाची लोक चळवळ उभारणे गरजेचे आहे. त्यामुळे सामाजिक वनीकरण विभागाने पर्यावरणाच्या संतुलनासाठी प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे.

# विद्युत वितरण कंपनीच्या लाईनमनाविरुद्ध शेतकऱ्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - रिसोड - तालुक्यातील दापूरी खुर्द येथील शेतकरी संतोष वामन भालेराव यांनी आपल्या शेतातील २०वर्षे जुने वडिलोपार्जित लिंबाचे झाड विद्युत वितरण कंपनीच्या लाईन मध्ये मशीनच्या सहाय्याने कापून टाकण्याची तक्रार जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे . ही घटना दिनांक २१सप्टेंबर २०२५ रोजी घडली असून, शेतकऱ्यांने प्रशासनाकडे न्याय मागणी केली आहे.




**घटनेचा सविस्तर तपशीलः**

संतोष भालेराव हे दापुरी खुर्द गावचे रहिवाशी असून, त्याचे वडील वामन सूर्यभान भालेराव (वय ८० वर्ष) यांच्या नावावर गट क्रमांक ९१व ९२अशी शेती आहे.

गट क्रमांक ९१ मधील शेतात विद्युत तारे जवळ असलेले मोठे लिंबाचे झाड सुमारे २० वर्षापासून उभे होते. मात्र दिनांक २१सप्टेंबर २०२५ रोजी चंद्रशेखर नावाच्या लाईनमनने, कोणतीही पूर्व सूचना न देता, मशीनच्या सहाय्याने झाड पूर्णपणे तोडून टाकले.

झाड तोडताना शेतात सोयाबीनचे पीक असतानाही, कोणतीही काळजी न घेता झाड येतात पाडण्यात आले. यामुळे पिकाचे नुकसान झाले असून, शेतकऱ्याच्या भावनांनाही धक्का बसला आहे"

**शेतकऱ्याची मागणीः**

अर्जदार संतोष भालेराव यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की-

'हे झाड आमच्या कुटुंबाचे वडिलोपार्जित होते. विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कोणतीही पूर्व सूचना न देता झाड कापून आमचे आर्थिक आणि मानसिक नुकसान केले आहे. त्यामुळे चौकशी करून दोषी लाईनमन वर कारवाई करण्यात यावी आणि नुकसान भरपाई मिळावी.'

**स्थानिक ग्रामस्थांचा रोषः**

या घटनेनंतर दापुरी खुर्द परिसरात संतापाचे वातावरण असून, ग्रामस्थांनी म्हटले आहे की- 'विद्युत विभागाचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय झाडे कापतात, पिकांची हानी करतात. अशा बेफिकीर कामकाजाला आळा बसावा'.

स्थानिकांनी मागणी केली आहे की प्रशासनाने त्वरित चौकशी करून संबंधित लाईन मनवर शिस्त भंग कारवाई करावी.

**प्रशासनाकडून चौकशीची मागणी**

शेतकऱ्याची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाल्यानंतर प्रशासन मात्र मूक आहे. महसूल विभाग आणि विद्युत वितरण कंपनीकडून संयुक्त पंचनामा करून प्रकरणाची सखोल चौकशीची करण्यात आली आहे.

**पर्यावरणीय हानीचा मुद्दाः**

तज्ञांच्या मते, अशाप्रकारे परवानगी शिवाय झाडे तोडल्यास पर्यावरणीय नुकसान होते. २० वर्ष जुने लिंबाचे झाड स्थानिक जैवविविधतेसाठी महत्त्वाचे होते, त्यामुळे प्रशासनाने भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी ठोस पाऊले उचलावित, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रिसोड तहसिल कार्यालयावर परिवर्तन शेतकरी संघटनेचे आंदोलन!

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - यावर्षी सततचा पाऊस व ढगफुटी अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ आणि पिकांचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याच्या हातात काहीच राहिले नाही अन त्यात शासनाने जाहीर केलेल्या मदतीच्या घोषणेमुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जात असल्याने आज दि. २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी लक्ष्मी पूजनाच्या दिवशी रात्री तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांना सोबत घेऊन दिवे लावून दिवाळी करून आंदोलन करणार, असे निवेदन परिवर्तन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मनोहर राठोड यांनी तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना दिले आहे.

यावर्षी ऑगस्ट महिन्याच्या अतिवृष्टीच्या पावसामुळे शेती खरडून तर गेलीच पण शेतातील उभे पीक पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांच्या आयुष्यात अंधार पसरले आहे . दिवाळी हा सण लक्ष्मी रूपाने अंधाराला नष्ट सर्वांच्या आयुष्यात प्रकाश (उजेड) आणतो, परंतु यावर्षी शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेला पॉकेज दिवाळीच्या पुर्व संधेपर्यंत एक पैसाही खात्यात न पडल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात ठेवणाऱ्या शासनाच्या तिजोरीत भरभराटी मिळावी म्हणून परिवर्तन शेतकरी संघटनेच्या वतीने आज लक्ष्मी पूजनाच्या दिवशी तहसील कार्यालय समोर दिवे लावून दिवाळी साजरी करण्याचा इशारा परिवर्तन शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# मोदी नावाने परिचित असलेले शेषराव चव्हाण यांचे निधन

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे फॅन मोदी नावाने परिचित असलेले वापटा येथील शेषराव चव्हाण ( वय ५० ) यांचा दि. २० ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास यवतमाळ येथे उपचार दरम्यान अल्पशा निधन झाले.



अत्यल्प भूधारक शेतकरी शेषराव यांचा दैनंदीन वावर पंचायत समिती आवारात होता. तालुक्यापासून १० किलोमीटर अंतरावर असलेल्या वापटा या खेडेगावातून दररोज पंचायत समिती कार्यालयात हजर राहत होता. तो पंतप्रधान नरेंद्र मोदीं व लोकनेता स्व आ. राजेंद्र पाटणी यांचा फॅन होता. म्हणून त्यांचे टोपण नाव मोदी म्हणून प्रत्येकांना परिचित होते. प्रत्येक निवडणुकीत मोदी नावाची टोपी डोक्यात परिधान करून गावागावात प्रचारासाठी हजर राहत होता. राजकारणी, पुढारी, पत्रकार अधिकारी, कर्मचारी यांनी आवाज देऊन चहा, कॉपी बिसलरी आणण्याचे काम कोणालाही नाही न सांगता नित्य नियमाने करत होता. मोबदल्यात कोणी काही दिले तरी ठीक आणि नाही दिले तरी ठीक पण त्याचे प्रेमाचे बोलणे एकसारखेच असायचे, अत्यंत मनमिळावू स्वभावाचा असल्याने सर्वांचे त्याच्यावर प्रेम होते. मोदी नावाने परिचित असलेल्या शेषराव चव्हाण यांच्यावर नियतीने काळा घातल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# भाजप युवा नेते भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव सुरज पाटील चौधरी यांना बिहार विधानसभा निवडणुकीत प्रचाराची जबाबदारी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - दिल्ली येथील भाजपच्या केंद्रीय कार्यालयात पार पडलेल्या बिहार विधानसभा प्रवासी कार्ययोजना बैठकीत महाराष्ट्रातील युवा कार्यकर्ते श्री. सूरज तुळशीराम चौधरी यांची बिहार विधानसभा निवडणुकीसाठी बक्सर विधानसभेचे प्रचारक म्हणून निवड करण्यात आली आहे.




या बैठकीत संबंधित विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण निवडणूक व्यवस्थापन, मायक्रो प्लॅनिंग आणि प्रचार आराखडा याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. १४ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत बिहारमध्ये प्रचाराचा प्रवास होणार आहे. मोदी सरकारच्या विविध योजना आणि विकासकामांचा जनतेपर्यंत प्रचार व प्रसार करण्याची जबाबदारी श्री. सुरज चौधरी यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सदरील बैठक भाजप राष्ट्रीय महासचिव सुनीलजी बंसल, भाजयुमो राष्ट्रीय अध्यक्ष खासदार तेजस्वी सूर्याजी, तसेच सर्व राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. भाजपकडून बिहारसारख्या महत्वाच्या निवडणुकीत काम करण्याची संधी दिल्याबद्दल सुरज चौधरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, भाजप प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्रजी चव्हाण, मंत्री पंकजाताई मुंडे, भाजप महासचिव आ. विक्रांतदादा पाटील, आ. रणधीरभाऊ सावरकर, भाजप संघटनमंत्री डॉ. उपेंद्रजी कोठेकर, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमजी चितलांगे, जिल्हा कार्याध्यक्ष राजू पाटील राजे, आ. बाबूसिंगजी राठोड, आ. श्यामभाऊ खोडे, आ. सईताई डहाके, माजी मंत्री अनंतरावजी देशमुख, माजी आमदार निलयजी नाईक, मा. आमदार लखनजी मलिक, मा. आमदार विजयराव जाधव, भाजप प्रदेश सचिव जयंतभाऊ देहनकर, दिनेशजी सूर्यवंशी, माजी आमदार पुरुषोत्तमजी राजगुरू, प्रदेश सदस्य गोपाल पाटील राऊत, विजय पाटील काळे, नरेंद्रजी गोलेच्छा, सुरेशभाऊ लुंगे, भाजयुमो प्रदेशाध्यक्ष अनुपदादा मोरे, प्रदेश महासचिव शिवानीताई दानी आणि बादलजी कुलकर्णी यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. सुरज चौधरी यांनी सांगितले की, 'माझ्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळणे ही अभिमानास्पद बाब आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून बिहारमध्ये भाजपचा विजय निश्चित करणार आहे.' सुरज चौधरी दिवाळी नंतर बिहारकडे प्रयाण करणार असून, आगामी निवडणुकीसाठी तेथे प्रचार मोहिमेची सूत्रे हातात घेणार आहेत.

RNI NO. 46973/1986 | Mahasagar Washim | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Mahatma Phule Market, Patni square. Head Office Phone-9922970023. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Vinod Tayade Mob No: 9563645555 (Responsible for editorial as per PRB act).

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ | महासागर वाशिम | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, महात्मा पहिले मार्केट, पाटणी चौक, वाशिम येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *विनोद तायडे, फोन : ९५६३६४५५५५* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

